**रे.दि. मु. नं.१००/२०२२ मधील नि.क्र.१९ खालील आदेश**
**(विजयकुमार नारायण भोसले वि. विलास बळवंत भोसले)**
**CNR No.-MHST16-000802-2022**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्त करणेसाठी केला आहे.

**वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे आहे की,**

२. प्रस्तुत कामातील प्रतिवादी हा दिनांक ०८.०९.२०२३ रोजी मयत झाला आहे. त्याला पत्नी विजया विलास भोसले, मुलगा सुर्यभान विलास भोसले, मुलगा अभिजीत विलास भोसले, मुलगा अस्मीत विलास भोसले असे कायदेशीर वारस आहेत. प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादीचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सदरच्या वारसांना दाव्यात सामील करणे आवश्यक असल्याने दाव्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी, ही विनंती वादीने केली आहे.

दाव्याचे सरनाम्यात **प्रतिवादीच्या नावापूढे "मयत वारस" असे लिहण्यात यावे व त्यांचे खालील नमुद वारसांना दाव्याचे सरनाम्यात सामील करणेबाबत हुकुम व्हावेत.**

**१अ) विजया विलास भोसले**
**उ.व.६८ वर्षे, धंदा– शेती,**
**१ब) सुर्यभान विलास भोसले**
**उ.व.४८ वर्षे, धंदा– शेती,**
**१क) अभिजीत विलास भोसले**
**उ.व.४५ वर्षे, धंदा– शेती,**
**१ड) अस्मीत विलास भोसले**
**उ.व.३७ वर्षे, धंदा– शेती,**
**सर्व रा. मु.पो. बावधन, ता. वाई,**
**जि. सातारा.**

३. प्रतिवादीने त्याचे म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश पारित होण्याविषयी विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज व दाव्यातील कथने तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी याचेविरुध्द दावा मिळकतीचा कब्जा व दरम्यानचे उत्पन्न ठरवून मिळण्याकरिता दाखल केला आहे. वादीने निशाणी १८ वर विलास बळवंत भोसले यांचे मृत्युचा दाखला दाखल केला आहे. त्यावरुन असे दिसून येते की प्रतिवादी विलास बळवंत भोसले हे दिनांक ८.९.२०२३ रोजी मयत झाले आहेत. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिनांक १६.१०.२०२३ रोजी दाखल केला आहे. अर्जातील दुरुस्ती ही मुदतीत आहे. तसेच सदर दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याचे स्वरुपातही बदल होणार नाही. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य होणार आहे. सबब दाव्याचे स्वरुप विचारात घेता व दाव्याचे अंतिम निराकरण होण्याकरीता अर्ज मंजूर करणे योग्य होईल. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमुद केलेली दुरुस्ती नियमानुसार विहीत वेळेत करावी व दुरुस्त प्रत १४ दिवसांचे आत दाखल करावी.

ठिकाण – वाई. (एस.एस.कुलकर्णी)
दिनांक – २९.०१.२०२४ चौथे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.